© 2020 IJRTI | Volume 5, Issue 10 | ISSN: 2456-3315

# वऱ्हाड प्रांतातील भारतीय स्वातंत्र्य चळवळ आणि बहिष्कार

**राजानंद पट्टेबहादूर,**

कुलदेवी निवास सोसायटी,
उल्हासनगर –४, जि. ठाणे.
राज्य – महाराष्ट्र

**प्रस्तावना :–**

राष्ट्रीय स्तरावर भारतीय स्वातंत्र्य आंदोलनासाठी जी साधने, तंत्रे वापरली त्याचा वापर वऱ्हाड प्रांतात लढल्या गेलेल्या भारतीय स्वातंत्र्य आंदोलनासाठी सुद्धा करण्यात आला. लोकमान्य टिळकांनी चतु:सुत्री सांगितली होती. स्वराज्य,स्वदेशी, राष्ट्रीय शिक्षण आणि बहिष्कार हया चार तंत्राचा वापर योग्य रितीने भारतीयांनी केला तर ब्रिटिशांना भारत देश सोडून जावाच लागेल अशा विश्वास लोकमान्य टिळकांना होता. विसाव्या शतकाच्या पूर्वार्धामध्ये होमरुल चळवळ, असहकार चळवळ आणि सविनय कायदेभंग सारख्या आंदोलनामध्ये बहिष्कार या तंत्राचा वापर झाला. हया लेखात वऱ्हाड प्रांतात बहिष्काराला कशी सुरुवात झाली, सामान्य जनतेने बहिष्कार तंत्राचा वापर कसा केला, त्याचा परिणाम झाला आणि भारतीय स्वातंत्र्य आंदोलनासाठी कितपत उपयोग झाला, याचा उहापोह या लेखात केला जाणार आहे.

*** बहिष्काराचा अर्थ :–**

एखादी व्यक्ती किंवा समुह यांच्याशी एखादया विषयावरुन झालेले मतभेद यामुळे त्यांना विरोध करणे, आपला असंतोष व्यक्त करण्यासाठी त्या व्यक्तींचा, समुहाचा त्याग करणे, त्याच्याशी संबंधित वस्तूंवर बहिष्कार टाकणे होय.

*** लोकहितवादींचे बहिष्काराबाबत विचार :–**

लोकहितवादी तथा गोपाळ हरी देशमुख हे महाराष्ट्रातील समाजसुधारक होते, त्यांची विविध विषयावर प्रभाकर या वृत्तपत्रातून १०० पत्रे प्रकाशित केली आहे. लोकहितवादींनी पत्र क्र. ६० मध्ये बहिष्काराबाबत आपले म्हणणे स्पष्ट केले आहे ते म्हणतात ‘इंग्रजांचे देशाचे सामान बंद करावे किंबहुना आपले सामान त्यास द्यावे परंतु आपण त्यांचे घेऊ नये. विलायती कापड घेऊ नये. त्यामुळे देशाचे रक्षण होऊन देशास रोजगार राहतील. इंग्लंडात व हिंदुस्थानात स्वदेशाची, बहिष्काराची व स्वराज्याची म्हणजे हिंदूस्थानात पार्लमेंट स्थापन करण्याची प्रचंड चळवळ झाली असती तर १८५८ साली ईस्ट इंडिया कंपनीचे राज्य व्हिक्टोरिया राणीकडे व ब्रिटिश मंत्रिमंडळाकडे न जाता ते हिंदी पार्लमेंटकडेही आले असते व आजपर्यंत अमेरिकेत झाले तसे होऊन हिंदूस्थान स्वतंत्र झाला असता’[१]

हे लोकहितवादींचे १८४९ सालचे विचार होते. त्यानंतर शतकभरांनी भारताला स्वातृंय मिळाले. बहिष्कार तंत्राचा वापर महत्त्वाचा ठरतो.

*** बहिष्काराबाबत दादाभाई नौरोजींचे विचार :–**

दादाभाई नौरोजींनी बहिष्काराबाबत म्हटले होते की, ‘राजकीय विचारक्रांतीचा आणि औद्योगिक उन्नतीच्या आकांक्षांचा मिलाफ ब्रिटीश मालाच्या बहिष्काराच्या चळवळीत होत असून या मालाच्या बहिष्कारातूनच पुढे ब्रिटिश सरकारच्या बहिष्काराचीही चळवळ उद्‌भवेल असे भविष्य दादाभाईंनी १८८० मध्ये केले होते.[२]

पुढील काळात खरोखर संपुर्ण भारतभर ब्रिटिशांच्या मालावर बहिष्कार करण्यात आल्याचे आढळून येते. सन १९०६ रोजी कॉंग्रेसचे अधिवेशन कलकत्ता येथे भरले होते. या अधिवेशनाचे अध्यक्ष दादाभाई नौरोजी होते. याच काळात कॉंग्रेसमधील जहाल व मवाळ यांचे मतभेद पराकोटीला पोहोचले होते. आपल्या अध्यक्षीय भाषणात दादाभाईंनी स्वराज्य, स्वदेशी, राष्ट्रीय शिक्षण आणि बहिष्कार या चतु:सुत्री वर भर दिला होता.

*** बंगालची फाळणी आणि बहिष्काराला सुरुवात :–**

भारताचा व्हाईसरॉय लॉर्ड कर्झन याने १९०५ मध्ये बंगालची फाळणी केली. प्रशासकीय कारणास्तव ही फाळणी केली असल्याचे कर्झनने जरी सांगितले तरी अंतस्त हेतू वेगळाच होता.

लॉर्ड कर्झनने बंगालची फाळणी करुन भारतीय जनतेतील असंतोषाला वाट मोकळी करुन दिली. बंगाल मधील जनतेने वंगभंग चळवळ सुरु केली. पुढे संपुर्ण भारतात ब्रिटिशांविरोधी वंगभंगाची चळवळ सुरु झाली.

वंगभंगाला सक्रिय प्रतिकार करण्यास बंगालमधील जहाल मवाळ गट एकत्रित आले. इंग्लिश मालावर पुर्णपणे बहिष्कार टाकून प्रतिकाराची चळवळ सुरु करण्याची कल्पना सुरेंद्रनाथ बॅनर्जी यांनी सुचविली आणि या चळवळीला बंगाली जनतेकडून प्रचंड प्रतिसाद मिळाला.[३] बहिष्काराबरोबर स्वदेशीची घोषणाही ओघानेच आली.

१३ जुलै, १९०५ रोजी एका बंगाली वृत्तपत्राने फाळणीच्या निषेधार्थ ब्रिटिश मालांवर बहिष्कार घालण्याचे आवाहन केले.[४]

लॉर्ड कर्झन याने केलेली बंगालची फाळणी अन्यायकारक ,हेतुपुरस्पर आहे हे आता जनतेला कळाले होते. हिंदु मुसलमान समाजात फुट पाडण्याचा डाव आहे, त्यामुळे याला संपूर्ण भारतातून कडाडून विरोध व्हावयाला हवा, या जाणिवेतून बनारस येथे १९०५ साली कॉंग्रेसचे अधिवेशन भरले होते. त्या अधिवेशनाचे अध्यक्ष गोपाळकृष्ण गोखले होते. त्यामध्ये बहिष्काराच्या ठरावाला मंजुरी देण्यात आली होती. त्यावेळी वाच्छा आणि सेटलवाड यांनी या ठरावाला विरोध केला होता. अधिवेशनानंतर लोकमान्य टिळक म्हणाले,‘‘हे नवे औषध ज्याचा कोठयाला पचेल तो खाईल, पचणार नाही तो खाणार नाही, पण रोगाला औषध योग्य असा तरी निर्णय राष्ट्राने दिला ही काही लहान गोष्ट नाही. [५]

लोकमान्य टिळक स्पष्टपणे आपले विचार केसरी वृत्तपत्रा मधून लिहित असत, ते म्हणतात की, राज्यकर्ते जेव्हा प्रजेचे ऐकत नाही तेव्हा प्रजा क्षुब्ध होऊन राजास शासन करण्यास प्रवृत्त होते, याचे एक मोठे उदाहरण खुद्द इंग्लंडच्या इतिहासात घडून झालेले आहे. विलायतेतील लोकांची विनवणी करणे किंवा अरेरावी करणाऱ्या अधिकाऱ्यांचे डोळे उघडण्यासाठी 'राष्ट्रीय बहिष्कार' हाच उत्तम उपाय आहे. विलायतेतील व्यापारास व मजुरास आम्ही विलायती माल घेऊन जे कोटयावधी दरसाल देतो तेवढे तरी आमच्याने बंद होऊ नयेत काय? जेव्हा देशी माल मिळणार नाही तेव्हा निदान विलायती तरी न घेता दुसऱ्या कोणत्या तरी देशातला घेऊन विलायतेतील आमच्या मागण्यांकडे दुर्लक्ष करणाऱ्या लोकांबद्दल आमच्या मनात उत्पन्न झालेला द्वेष आम्ही का व्यक्त करु नये?[६]

याचाच अर्थ परकीय माल विकत घेऊ नका. परकीय वस्तूंवर बहिष्कार टाकणे होय. लोकमान्य टिळकां इतका ब्रिटीशांना उघडपणे स्पष्ट विरोध करणारा दुसरा नेता नव्हता. त्यामुळेच ब्रिटिश सरकारला लोकमान्य टिळक म्हणजे ट्रबलमेकर वाटू लागले. या विचारांचा त्यांचे मोठया प्रमाणात अनुयायी असणाऱ्या वऱ्हाड प्रांतावर त्याचा परिणाम होणार होता.

*** वऱ्हाडमध्ये बहिष्कार चळवळीला सुरुवात :—**

वऱ्हाड प्रांतात अमरावती जिल्हा आहे. तेथील दादासाहेब खापर्डे आणि नागपुरचे डॉ.बी.एम. मुंजे हे दोघेही लोकमान्य टिळकांचे कट्टर अनुयायी आणि मित्रही होते. त्यामुळे लोकमान्यांच्या जहाल विचारांचा मोठा प्रभाव त्यांच्यावर पडला होता. लोकमान्य टिळकांनी स्वराज्य, स्वदेशी, राष्ट्रीय शिक्षण आणि बहिष्कार ही चतु:सूत्री होती.

नागपुर आणि वऱ्हाडमध्ये खापर्डे, मुंजे या नेत्यांनी स्वदेशी व बहिष्काराचा मंत्र सामन्यापर्यंत पोहचविण्यासाठी प्रयत्नांची पराकाष्ठा केली. गावोगावी सभा घेण्यात आल्या. स्वदेशी वस्तूंची दुकाने उघडल्या गेली. विद्यार्थ्यांना स्वदेशीची शपथ घेण्यास प्रवृत्त केले. एप्रिल १९०६ मध्ये जबलपूरला झालेल्या मध्यप्रांत व वऱ्हाडच्या प्रांतिक परिषदेत डॉ. मुंजे यांनी स्वदेशीचा ठरावा मांडला आणि या हिंदी भाषी भागाला त्यांनी व खापडर्यांनी स्वदेशी व बहिष्काराचा मंत्र दिला. यवतमाळ भागात हा प्रचार बाबासाहेब परांजपे, शामराव देशपांड, पृथ्वीशीर गोसावी आदी मंडळींनी केला . हरिकिशोर, देशसेवक ही नागपूर वऱ्हाडकडील वृत्तपत्रे स्वदेशी व बहिष्काराच्या प्रचाराची प्रभावी माध्यमे बनली.[७]

दादासाहेब खापर्डे यांनी २१ फेब्रुवारी १९०७ ते ३ जून पर्यंत कोकण तसेच मध्यप्रांत व वऱ्हाड या प्रांतातील प्रमुख जिल्हयातील शहरांमध्ये भाषणेदेखील दिली व जनमत चतु:सूत्रीला अनुकूल करण्याचे प्रयत्न केले.[८]

वऱ्हाडातील यवतमाळचे लोकनायक बापुजी अणे हे वंगभंग आंदोलन पाहून प्रभावित झाले. स्वत: व्यवसायाने वकील असलेले अणे यांनी स्वातंत्र्यलढयात उडी घेतली. ते म्हणतात 'बंगालबद्दल जर खरी सहानुभूती दाखवायची असेल तर बंगालमध्ये प्रतियोगाचे जे बहिष्काराचे शस्त्र उचलले गेले आहे. त्याचाच आम्ही आश्रय घ्यायला हवा.'[९]

अशाप्रकारे वऱ्हाड प्रांतात बहिष्कार चळवळीला सुरुवात झाली होती. ब्रिटिशांच्या विरुध्द जनतेमध्ये जागृती होण्यासाठी बहिष्कार या तंत्राचा वापर सुरु झाला होता.

*** वऱ्हाडमधील असहकार चळवळ आणि बहिष्कार :—**

महात्मा गांधीजींनी १९२० मध्ये ब्रिटीशांविरोधात असहकार चळवळ सुरु केली होती. संपूर्ण कॉंग्रेस पक्ष महात्मा गांधीच्या मार्गदर्शनाखाली असहकार आंदोलनात उतरला होता.

असहकार चळवळीमध्ये ९ कलमांचा समावेश करण्यात आला होता. त्यात शाळा, कॉलेज, कौन्सिल व न्यायालये यांवर बहिष्कार हा एक महत्त्वाचा मुद्दा होता. यवतमाळचे लोकनायक बापुजी अणे यांनी स्वत: वकिली करणे सोडून बहिष्काराचा कार्यक्रम अंमलात आणला होता. यवतमाळमधील इतर वकिलांनी सुध्दा बापुजी अणे यांचे अनुकरण करत वकिली सोडून दिली होती. शाळांवर बहिष्कार हा कार्यक्रम अणे यांना पसंत नव्हता. जर शाळेवर बहिष्कार टाकला तर विद्यार्थ्यांचे जीवन बर्बाद होढल. बरं या विद्यार्थ्याला दुसऱ्या शाळेत किंवा राष्ट्रीय शाळेत शिकविण्याची व्यवस्था करण्याचा कुठलाही कार्यक्रम कॉंग्रेसने घोषित केला नाही, अशा परिस्थितीत शाळेवर बहिष्कार टाकला तर अकारण विद्यार्थी उघडयावर पडतील हे होता कामा नये असं त्यांचे स्पष्ट मत होते.[१०]

''यवतमाळ डिस्ट्रिक्ट असोशिएनचा कौन्सिल बहिष्काराला पूर्ण विरोध होता. असेब्लीकरीता श्री. बापूजी अणे स्वत: उभे होते. ''[११] कौन्सिलवर बहिष्कार टाकायला नको या विचाराचे बापूजी अणे होते .तेथे आपल्याला सरकारला विरोध करता येईल. जनतेची कामे करता येतील या विचारांनी बापूजी अणे यांनी कौन्सिलवर बहिष्कार टाकण्यास नकार दिला. शाळांवर बहिष्कार, कौन्सिलवर बहिष्कार, न्यायालयांवर बहिष्कार, सरकारी कार्यालयांवर बहिष्कार याचा जरी असहकार चळवळीच्या समावेश होता तरी मात्र न्यायालयांवर बहिष्कार टाकण्याच्या असहकाराच्या कार्यक्रमाला विदर्भात विशेष प्रतिसाद मिळाला नाही. मात्र राष्ट्रीय शिक्षणाबाबतीत तसे झाले नाही. 'वर्धा, नागपूर, अमरावती, चंद्रपुर, भंडारा, अकोला, यवतमाळ, बुलढाणा या प्रत्येक जिल्हयात राष्ट्रीय शाळा स्थापन करण्यात आल्या.[१२]

मध्यप्रांत आणि वऱ्हाडच्या कौन्सिलमध्ये ७० पैकी ४२ सदस्य स्वराज्य पक्षाचे निवडून आल्याने त्यांचे सरकार बनले. डॉ. खरे यांनी कौन्सिलमध्ये ब्रिटिश मालावरील बहिष्काराचा ठराव मांडला व तो ठराव ४० विरुध्द २२ अशा बहुमताने पास झाला.[१३]

अकोला जिल्हयामध्ये असहकार चळवळ जोरात सुरु होती. अकोल्याचे मामा जोगळेकर, नानाभाई इच्छाराम मश्रुबाला राष्ट्रीय शाळेचे संस्थापक शस्त्रबुध्दे यांनी जिल्हाभर प्रचारकार्य केले त्याचा परिणाम दिसू लागला. 'अकोल्यातील एक वकील चौधरी यांनी असहकार म्हणून वकिली सोडली.[१४]

अकोला जिल्हयातील पांढरकवडयाचे अब्दुल रौफशाह यांनी वकीली सोडून असहकार चळवळीत भाग घेतला होता.[१५]

वऱ्हाडला बेरार प्रांत म्हटले जाई. या प्रांतातील चारही जिल्हयात असहकार चळवळ जोरात सुरु होती. अमरावती मध्ये सुध्दा महात्मा गांधीजींनी संपूर्ण भारतात सुरु केलेल्या असहकार चळवळीचे पडसाद उमआयला सुरुवात झाली होती. न्यायालयांवर बहिष्कार टाकण्याच्या कार्यक्रमामुळे अमरावतीच्या माहेरील वकील यांनी वकीली सोडून त्यांच्या मृत्यूपर्यंत विदर्भ प्रदेश कॉंग्रेस कमिटीमध्येते कार्य करीत होते.[१६]

अमरावती जिल्हा कॉंग्रेसचे अध्यक्ष डॉ. पंजाबराव देशमुख उपाध्यक्ष शंकरराव यशवंतराव वाटाणे, चौबळ वकील, नानासाहेब गवई यांनी खादी प्रचाराकरीता पायी दौरे काढले. दर्यापूर, अचलपूर, चांदूर ,मोर्शी या तालुक्यातील काही ठिकाणी गेले. खादीचा प्रचार केला. परदेशी वस्तू वापरु नका, त्यावर बहिष्कार टाका हे ओंघाने आलेच.[१७]

*** वऱ्हाडमधील सविनय कायदेभंग चळवळ आणि बहिष्कार :—**

ब्रिटिश सत्तेविरोधात भारतात लढल्या गेलेल्या सविनय कायदेभंग चळवळीचे दोन टप्पे पडतात. सविनय कायदेभंगाच्या पहिल्या टप्प्यात महात्मा गांधीजींनी 'दांडी मार्च' सुरु केला होता. मिठाचा सत्याग्रह करुन कायदा मोडायचा असा गांधीजींचा कार्यक्रम होता. त्यामुळे संपूर्ण भारतभर हा कार्यक्रम सुरु झाला. वऱ्हाड प्रांतामध्ये सुद्धा सविनय कायदेभंग चळवळ सुरु झाली. अकोल्यातील दहीहांडा येथील खारट पाण्यापासून मीठ तयार करुन तिचा लिलाव केला जात होता. वऱ्हाडातील चारही जिल्हयात हा सत्याग्रह यशस्वीपणे पार पाडला होता.

सविनय कायदेभंगाच्या दुसऱ्या टप्प्यात वऱ्हाडमध्ये बहिष्कार तंत्राचा वापर केला होता. विदेशी कापडांवर बहिष्कार विदेशी कपडयांच्या दुकानावर पिकेटिंग करणे सुरु झाले होते.

वऱ्हाडमध्ये स्थापन झालेल्या स्वदेशी प्रचारक सभेकडून भारतीय वस्तुंचीच खरेदी करण्याचा आग्रह केला जात होता. Buy Indian ,Don't buy Brithish सारखे घोषवाक्य स्वदेशी प्रचारक सभेकडून प्रचारार्थ म्हटले जात होते.[१८]

अकोला आणि बुलढाणा जिल्हयात सविनय कायदेभंगाच्या दुसऱ्या टप्प्यात अधिक आक्रमकपणा जाणवला. धरणे आणि सभांचे आयोजन अनेक ठिकाणी करण्यात आले. परदेशातील कापड विकणाऱ्या दुकानांसमोर निरोधने करण्यात आली. अकोल्यातील परदेशी कपडे विकणाऱ्या दुकानदारांनी स्वत:हून हया कपडयांचा स्टॉक सीलबंद केला होता. परकीय कपडयांवरील बहिष्कार अकोला तालुक्यातील बाळापूर, तेल्हारा, अकोट येथे यशस्वीपणे करण्यात आला. बुलढाणा जिल्हयातील खामगाव येथे काही दुकानांसमोर दीड महिने निरोधने केल्यानंतर त्या दुकानदारांनी पदेशी वस्तू विकणे बंद केले.[१९]

अमरावतीचे सर मोरोपंत जोशी यांचे विचार थोडे वेगळे होते. त्यांचे म्हणणे होते जनतेने स्वदेशी वस्तूंची खरेदी करण्यासाठी जोर द्यावा मात्र जर त्या उपलब्ध नसतील तर ब्रिटिश वस्तूंशिवाय इतर परकीय वस्तूंची खरेदी करावी.[२०]

वऱ्हाडमधील अमरावती येथे १२ जानेवारी १९३२ व १४ जानेवारी १९३२ हया दोन दिवशी मोठया सत्रांचे आयोजन करण्यात आले होते. या सभेत ब्रिटिश मालावरील बहिष्काराचा ठराव पास करण्यात आला होता.[२१]

वऱ्हाड प्रांतात सविनय कायदेभंगाच्या दुसऱ्या टप्प्यात बहिष्कार सुरु होते. यवतमाळ जिल्हयाचे लोकनायक बापुजी अणे यांना कॉंग्रेसचे अध्यक्ष बनवले होते. अनेक मोठया नेत्यांना अटक झाली होती. त्यात महात्मा गांधी, पंडीत जवाहरलाल नेहरु यांचाही समावेश होता. त्यामुळे बापुजी अणे यांनी जनतेसाठी आणि कॉंग्रेससाठी उद्देशून म्हटले होते की, 'सध्याच्या स्थितीत सविनय कायदेभंगाची चळवळ मागे घेऊ नये, मला अटक झाली तर माझ्या जागी जयरामदास दौलतराम हे कॉंग्रेसचे काम पाहतील.[२२]

ब्रिटिशांविरोधात वऱ्हाडमध्ये सविनय कायदेभंग चळवळ मोठया जोमात सुरु होती. परदेशी दुकानांसमोर निरोधने, परदेशी कपडयांवर वस्तूंवर बहिष्कार सुरु होता.

*** वऱ्हाडातील स्त्रिया आणि बहिष्कार :—**

वऱ्हाडातील स्त्रियांनी लोकमान्य टिळकांच्या काळापासून ब्रिटिशांविरोधात चळवळीत भाग घेतला होता.

१९०५ साली बनारस येथे झालेल्या राष्ट्रीयसभेच्या अधिवेशनाला यशोदाबाई जोशी उपस्थित होत्या. स्वदेशी वस्तूचाच वापर करण्याचा त्यानी निश्चय करुन त्या म्हणतात स्वदेशी व्रत पाळण्यात आमच्या मुलांनीही आमच्याशी खुषीने सहकार्य केले. वनिता समाजातील स्त्रियाही उत्साहाने कार्य करु लागल्या. अमरावती, अकोला, यवतमाळ या जिल्हयातील स्त्रियांच्या समित्या स्थापन करुन स्त्रियांची मानसिकता तयार करण्याचे कार्य करण्यात आले. स्वत: यशोदाबाई जोशी व्याख्याने देऊ लागल्या. स्वदेशी व बहिष्काराचे वारे संपूर्ण वऱ्हाड प्रदेशात वाहू लागले.[२३]

वऱ्हाड प्रांतामध्ये असहकार चळवळीमध्ये महिलांनी मोठया प्रमाणावर काम केले आहे. 'महिलांना उद्देशून अमरावती शहारात काही पत्रके निघाली होती त्यात लिहिले होते 'संक्रातीचा सण परदेशी साखर वापरुन साजरा करणे म्हणजे राष्ट्रद्रोह होय.[२४]

अकोला येथील महिलाही राष्ट्रीय कार्यात सक्रिय होत्या. १९२५ साली मुंबईच्या लक्ष्मीबाई फरडे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या सभेत महिलांनी सूत कातायला शिकले. विदेशी वस्तूंवर बहिष्कार घालवण्याबाबतची भाषणे झाली होती .[२५]

*** वऱ्हाडमधील बहिष्कार चळवळीचे परिणाम :—**

वऱ्हाडमध्ये आणि संपूर्ण भारतामध्ये बहिष्काराच्या चळवळीचे परिणाम दिसून येतात. 'इंग्लंडमधील कापड गिरण्यांशी तीव्र स्पर्धा करावी लागत होती. आता मात्र स्वदेशी व बहिष्काराची चळवळ गिरणी मालकासाठी मोठे वरदान ठरले. बंगालमधील बहिष्काराने मुंबईतील गिरण्यांच्या कापडास अचानक मागणी वाढली. त्यामुळे गिरण्यांमधील रोजगार वाढला. जून १९०५ मध्ये अहमदाबाद शहारात २२ गिरण्या होत्या. त्यांची संख्या जूनमध्ये १९१० मध्ये ५२ झाली होती.[२६]

हिंदुस्थानात दरसाल पस्तीस—चाळीस कोटींचे ब्रिटीश कापड खपते. त्यावर बहिष्कार टाकला की त्या उत्पन्नाला ब्रिटिश व्यापारी अंतरुन हिंदुस्थानात विपरित घडत असल्याने त्यांना भाव येईल.अशा परिणामांचा स्वदेशी व बहिष्कार हा उपाय होता. ब्रिटिश राज्यकर्त्यांना शुध्दीवर आणणारा हा उपाय आहे. या जाणिवेने टिळकांनी तो आवेशाने उचलून धरला.''[२७] या चळवळीची राजकीय व आर्थिक ही दोन उपांगे ठरविण्यात आली. याच कालखंडात चिनी लोकांनी अमेरिकन मालावर घातलेला बहिष्कार यशस्वी झाल्याने भारतीय लोकांमध्येही अशा प्रतिकाराची वृत्ती निर्माण होण्यास मदत झाली.[२८]

*** निष्कर्ष :—**

ब्रिटिश सरकार विरोधी भारतात सुरु झालेल्या बहिष्काराच्या चळवळीचे परिणाम मोठे होते. वंगभंग आंदोलन ते सविनय कायदेभंग या दरम्यानच्या काळात ब्रिटिश वस्तूंवर वऱ्हाडी जनतेने अनेकदा बहिष्कार टाकला होता त्यातून भारतामध्ये स्वदेशी चळवळीला सुरुवात होऊन खादीचा प्रचार व प्रसार बराच झाला होता. यातून भारतीय गिरण्यांमध्ये उत्पादन वाढू लागले तसेच रोजगार सुद्धा वाढल्याचे दिसून येते. परदेशी कापडांवर बहिष्कार टाकल्याने ब्रिटिश व्यापाऱ्यांचे नुकसान होऊन भारतीयांबद्दल विचार करायला सुरुवात झाली होती. बहिष्कार हया तंत्रामुळे भारतीय जनतेमध्ये सर्वधर्म समभावांची भावना एकत्रीत वाढायला लागली. सर्व धर्माचे लोक त्यानिमित्ताने एकत्र यायला लागले. त्यामुळे पुढील काळात भारतीय स्वातंत्र्याची चक्रे वेगाने हालायला सुरुवात झाली.

***	संदर्भसूची :—**


१. जावडेकर श.द, आधुनिक भारत, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, २००९, पुणे पान नं. ३०.
२. किलता,पान नं. १६०.
३. वैद्य सुमन, कोठेकर शांता, महाराष्ट्रातील कॉंग्रेसचा स्वातंत्र्यलढा, महाराष्ट्र राज्य, साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई २००८, पान नं. ७४.
४. देशपांडे सरोज (अनु.) एस. गोपाल, ब्रिटिशांची भारतातील राजनीती, डायमंड पब्लिकेशन्स, पुणे, २००६, पान नं.—३६५.
५. वैद्य सुमन, कोठेकर शांता, उपरोक्त, पान नं. ७७.
६. फाटक न.र., लोकमान्य, मौज प्रकाशन मुंबई, २०१२, पान नं. २४६.
७. वैद्य सुमन, कोठेकर शांता, उपरोक्त, पान नं. ७९.
८. वक्काणी नि.आ., आधुनिक विदर्भाचा इतिहास, श्री मंगेश प्रकाशन, २००३, पान नं. ४१.
९. कित्ता, पान नं. ४२.
१०. कित्ता, पान नं. १००.
११. पेशवे वसंत बाळासाहेब, पेशवे मंदाकिनी, यवतमाळ जिल्हयातील स्वातंत्र्यलढा, ऑगस्ट क्रांती सुवर्ण महोत्सव समिती, मुंबई, १९९२, पान नं. — ३७.
१२.कोलारकर श.गो., आधुनिक विदर्भाचा इतिहास श्री मंगेश प्रकाशन, नागपुर, २००३, पान नं. ९२—९३.
१३. कित्ता, पान नं. ९८—९९.
१४. कित्ता, पान नं. ९०.
१५. बियाणी ब्रिजलाल (संपा.) शुक्ल अभिनंदन ग्रंथ, पान नं. ३३७.
१६. कित्ता, पान नं. — ३३७.
१७. दिधकर नानासाहेब, अमरावती जिल्हयातील स्वातंत्र्यलढा, ऑगस्ट क्रांती, सुवर्ण महोत्सव समिती मुंबई — १९९२, पान नं.३०.
१८. Report for the first half of march 1932, central provinces & Berar Poice, source material for a fistory of freedom movement, Gazetteors Dept., Bombay 1995, page No. 78.
१९. Quarterly Report of all Indian congress committee 30th March 1932. Source material for a History of Freedom movement, Gazetters Dept, Bombay 1998, Page No. 205.
२०. Report for the first half of march 1932, central provinces & Berar Poice, Source material for a History of freedom movement, Gazetteors Dept., Bombay 1995, page No. 215.
२१. Central provinces police Abstract of Intelligence 25 January 1932 Source material for a History of freedom movement, Gazetteers Deptt. Bombay, 1995, Page No. 288.
२२. Statement of M. S. Aney Acting congress president, 22nd July 1933 Source Material for a History of freedom movement, Gazetteros Dept. Bombay 1995, Page No. 235.
२३. पाठक दमयंती, वैदर्भिय महिलांचे स्वातंत्र्य संग्रामातील सहकार्य, श्री. मंगेश प्रकाशन, नागपुर, २००३, पान नं. ३४.
२४. कारंजकर भि.दे., अमरावती शहराचा इतिहास भाग पहिला व दुसरा सचित्र अमरावती नगरपालिकेच्या शताब्दी महोत्सव निमित्त प्रकाशित, १९७८, पान ने.१८.
२५. पाठक दमयंती, उपरोक्त, पान नं. — ५८.
२६. चौधरी के. के., आधुनिक महाराष्ट्राचा इतिहास, महाराष्ट्र राज्य, सांस्कृतिक आणि संस्कृती मंडळ, मुंबई, २००५, पान नं. ५७५.
२७. फाटक न.र. उपरोक्त, पान नं. — २४५.
२८. चौधरी के. के. उपरोक्त पान नं. ५७३.